# ७. रंगलेला सामना

**लीलाधर हेगडे** (१९२७) : बालसाहित्यकार, कथाकार, कादंबरीकार, ललितगद्य लेखक. 'गुंतागुंत', 'फेडाफेडी','पुन्हा प्रपंच' इत्यादी ललितगद्य लेखन; 'तरीही हात शिवशिवतच राहिले' ही कादंबरी; 'बैलांचा गोंधळ' ही विनोदी कथा; 'थोर चित्रकार', 'पाचूचे बेट', 'वेरूळचे वैभव' 'हणमू' अशी अनेक बालसाहित्याची पुस्तके प्रसिद्ध. सन २०१५ साली साहित्य अकादमीने त्यांना 'बाल साहित्य पुरस्कारा'ने सन्मानित केले आहे.

प्रस्तुत पाठात लेखकांनी शाळेतील दोन इयत्तांमध्ये कबड्डीच्या रंगलेल्या सामन्याचे वर्णन केले आहे.

आज शाळेतील खेळांच्या सामन्यांचा शेवटचा दिवस होता, त्यामुळे आज सर्व खेळांचे अंतिम सामने होणार होते. सामने पाहायला विद्यार्थी, शिक्षक व अनेक पालक क्रीडांगणावर जमलेले होते.

कबड्डीच्या अंतिम सामन्यासाठी सहावी विरुद्ध सातवी हे संघ क्रीडांगणावर दाखल झाले. सर्वांनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले.

ओली-सुकी झाली. सहावीच्या कर्णधाराने ओली-सुकी जिंकली. त्याने दम घालण्यास सुरुवात केली. सातवीचे खेळाडू तयारच होते. त्यांनी सहावीच्या कर्णधाराला चांगले कोपऱ्यात घेतले. कोपरा धरणाऱ्या मुलाने मोठ्या धीराने त्याचा पाय पकडला. त्याबरोबर मधल्या भिडूने त्याच्यावर एकदम झडप घालून त्याला पकडले. प्रेक्षकांतून जोरदार आरोळ्या उठल्या. सुरुवातीपासून सामना रंगायला सुरुवात झाली.

सातवीच्या संघाचा आवेश वाढला. त्यांचा हुकमी एक्का सावंत कबड्डी घालण्यास गेला. ''सावंत, पाच बाद पाहिजेत पाच!'' असे काही मुले ओरडली. सावंतच्या अंगात चांगलीच ताकद होती. त्याचे हाडपेरही मजबूत होते; पण सहावीच्या खेळाडूंनी त्याला पकडायचा निर्धार केला होता. सावंत आत आला, तशी सहावीच्या खेळाडूंनी साखळी धरली. बघता बघता त्याला त्यांनी घेरले; पण सावंत कसला वस्ताद! त्याने हां हां म्हणता साखळी तोडली व तो मध्यरेषेकडे तडफेने पोहोचला. त्याबरोबर आवाज उठले, ''शाब्बास सावंत, भले बहाद्दर!'' सहावीचे तीन गडी बाद झाले. प्रेक्षकांत धमाल उडाली.



मग सहावीचा चिवट सुळे कबड्डी घालण्यास गेला. मूर्ती लहान, पण कीर्ती महान! अत्यंत सावधपणे तो खेळत होता. इतक्यात एका खेळाडूने त्याचे पाय पकडण्यासाठी समोरून मुसंडी मारली. सुळेने त्याच्या पाठीवर हात ठेवून टुणकन उडी मारली व तो आपल्या संघाकडे सफाईने निघून गेला. ''शाब्बास सुळे!'' मुलांनी आरोळ्या ठोकल्या. सहावीचा कर्णधार जिवंत झाला.

सातवीच्या कर्णधाराने 'घाई करू नका!' असा खेळाडूंना इशारा दिला. आपला एक चपळ गडी दम घालण्यास पाठवला. सहावीचा एक गडी बाद करून तो चपळाईने परत आला, मग सहावीचा खेळाडू कबड्डी घालण्यास गेला. ''अरे याला धरा!'' असा प्रेक्षकांतून आवाज आला; पण या वेळी तो फारच सावध होता. पुन्हा चूक करायची नाही, असे त्याने ठरवले होते. एकही गडी न मारता तो परत आला.

सावंत या वेळी मोठ्या रुबाबात पुन्हा कबड्डी घालण्यास गेला. त्याचा दम संपत आला, इतक्यात सहावीच्या कर्णधाराने त्याची तंगडी पकडली. त्याबरोबर त्याने चपळाई केली; पण खेळाडूंनी त्याला मिठी मारून एकदम उचलले. त्याचा नाइलाज झाला. सावंत बाद झाला. प्रेक्षकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. सहावीची मुले आता नाचू लागली. यशाचे पारडे कधी या बाजूला तर कधी त्या बाजूला झुकत होते. खेळ सुरू होऊन दहा मिनिटे झाली, पंचांनी शिटी फुंकून मध्यंतरासाठी खेळ थांबवला.

पुन्हा पाच मिनिटांनी खेळायला सुरुवात झाली. या वेळी बाजू बदलली गेली. सहावीचा कर्णधार आपल्या भिडूंना म्हणाला, ''घाबरू नका. कमी गुण मिळाले तरी हरकत नाही; आत्मविश्वासाने खेळा. आपण सातवीला हरवणारच.''

सहावीचा संघ चढाईचा खेळ खेळू लागला. सातवीचा संघ घाई न करता खेळत होता. त्या संघास पहिल्या डावात जे अधिक गुण मिळाले होते, ती सरशी त्यांना टिकवायची होती.

सहावीच्या संघाने मात्र सातवीच्या खेळाडूंना निदान रेषाच ओलांडू द्यायची नाही, असा चंग बांधला होता. रेषा न ओलांडणारा गडी बाद होत असे. ती ओलांडण्याचा जो प्रयत्न करील, त्याला ते जिद्दीने पकडू लागले. त्यांच्या अंगात नुसता जोम संचारला होता! सातवीचा कर्णधार सावंत आणि राहिलेले पाच खेळाडू हे सर्वच्या सर्व बाद झाले. सातवीवर लोण चढले, तेव्हा एकच जल्लोष झाला. आता वेळही फार थोडा होता. दोन्ही संघ अटीतटीने खेळत होते. खेळाची वेळ संपली. पंचांनी शिटी फुंकली. खेळ थांबला. सहावीचा विजय झाला होता. सातवीचा संघ हरला होता; पण दोन्ही संघांच्या कर्णधारांनी एकमेकांना मिठ्या मारल्या. प्रेक्षकांनी टाळ्या वाजवल्या. गुरुजींनी येऊन दोन्ही संघांना शाबासकी दिली. सर्वांची पाठ थोपटली.

सामना किती रंगला होता! भांडण नाही की तंटा नाही; पण खेळात जोश किती! सामना असावा तर असाच!

◆◆◆

## स्वाध्याय

**प्र.१. (अ) कारणे शोधा.**

(१) सुरुवातीलाच सामना रंगायला सुरुवात झाली, कारण...........

(२) 'पाच बाद पाहिजेत पाच !'' असे काही मुले ओरडली, कारण...........

**(आ) खालील वाक्यांतून त्या त्या खेळाडूंचे कोणते गुण दिसतात ते खालील यादीतून शोधून लिहा.**

(१) त्याबरोबर मधल्या भिडूने त्याच्यावर एकदम झडप घालून त्याला पकडले.

(२) सावंतने हां हां म्हणता साखळी तोडली.

(३) सुळे आपल्या संघाकडे सफाईने निघून गेला.

(४) घाबरू नका, कमी गुण मिळाले तरी हरकत नाही.

(५) दोन्ही संघांच्या कर्णधारांनी एकमेकांना मिठ्या मारल्या.

(समयसूचक, आळशी, प्रसंगावधानी, खिलाडूवृत्ती, घाबरट, कुशल, धैर्यशील, विश्वासू)

**प्र.२. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) मूर्ती लहान पण कीर्ती महान | (अ) सहावीची मुले |
| (२) हाडापेराने मजबूत | (आ) पंच |
| (३) जिंकणारा संघ | (इ) सुळे |
| (४) मध्यंतरासाठी खेळ थांबवणारे | (ई) सावंत |

**प्र.३. (अ) खालील वाक्प्रचार वाचा व त्यांचे अर्थ शोधा. त्या वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.**

(१) हाडपेर मजबूत असणे. (२) निर्धार करणे. (३) धमाल उडणे.

**(आ) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

(१) त्यांचा खेळातील दम संपत आला.
(२) कॅप्टनने खेळाडूला इशारा दिला.
(३) क्रीडांगणावर अंतिम सामना पाहण्यासाठी गर्दी जमली होती.

**प्र. ४. स्वमत.**

(१) पाठातील रंगतदार सामन्याचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.
(२) संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासात खेळाचे असलेले महत्त्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.
(३) 'मी अनुभवलेला चुरशीचा सामना' या विषयांवर आठ ते दहा ओळी लिहा.

## भाषाभ्यास

### २. द्वंद्व समास

- **खालील उदाहरणे वाचा व अभ्यासा.**

(१) मुलांनी आईवडिलांची आज्ञा पाळावी.
(२) आई गावाहून चार पाच दिवसांत परत येईल.
(३) दूरच्या प्रवासात सोबत अंथरूण पांघरूण घ्यावे.

(१) अधोरेखित शब्दांत किती पदे आहेत?
(२) दोन्ही पदे महत्वाची वाटतात काय?

**द्वंद्व समास वैशिष्ट्ये**

दोन्ही पदे महत्वाची

समासाचा विग्रह आणि, व, अथवा, किंवा या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांनी नाहीतर वा, किंवा, अथवा या विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययांनी करतात.

**द्वंद्व समासाचे तीन उपप्रकार**

| (१) इतरेतर द्वंद्व | (२) वैकल्पिक द्वंद्व | (३) समाहार द्वंद्व |
|---|---|---|
| दोन्ही पदे महत्त्वाची. विग्रह – आणि, व या समुच्च्यबोधक उभयान्वयी अव्ययांनी करावा. | दोन्ही पदे महत्त्वाची. विग्रह वा, किंवा, अथवा अशा विकल्प बोधक उभयान्वयी अव्ययांनी करावा. | दोन्ही पदे महत्त्वाची. दोन्ही पदांसोबत त्याच प्रकारच्या इतर पदांचा समावेश (समाहार) गृहीत धरलेला असतो. |
| उदा., कृष्णार्जुन<br>कृष्ण आणि अर्जुन | उदा., खरेखोटे<br>खरे किंवा खोटे | उदा., भाजीपाला<br>भाजी व इतर गोष्टी |